# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये झालेले द्वितीय अपिल

## अपिल क्रमांक : केआर -४६३९/२०१७ मधील तक्रार क्र. १८/२०२०

अपिलार्थी, श्री.दिनेश अनंत कोळी,
रा.सि.टी.सर्व्हे नं.२२०, दत्तमंदिराच्या मागे,
(मॉलीशवाले बाबाचे घर), चेंदणी कोळीवाडा, ठाणे (प.), ता.जि.ठाणे ४०० ६०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, प्रमुख लिपिक, नगर भूमापन अधिकारी,ठाणे,
यांचे कार्यालय, तहसिलदार कंपाऊंड, ठाणे, ता.जि.ठाणे ४०० ६०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २६/४/२०१८**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २१/७/२०१७ | २८/७/२०१७ | २९/८/२०१७ | २९/९/२०१७ |

अपीलार्थीस दि.२१/७/२०१७ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली टिका नं.२ न.भू.क्र.२१५ मिळकतीबाबत सन १९४१ सालचे कागदपत्रांसंदर्भात माहिती न मिळाल्यामुळे आयोगास दि.३१/१०/२०१७ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपिलावर आज दिनांक २६/४/२०१८ रोजी फास्ट ट्रॅक सुनावणी (Fast Track Hearing) घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, त्यांच्या दिनांक २१/७/२०१७ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले की, त्यांनी दिनांक २८/७/२०१७ रोजी माहिती उपलब्ध नसल्याबाबत कळविले आहे. सन १९४१ ची नस्ती असून, ३० वर्षानंतर नस्ती नष्ट करतात.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. आजच्या सुनावणीत स्पष्ट झाले की, अपिलार्थी यांनी मागितलेली कागदपत्रे दफ्तरी उपलब्ध नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७ (६) व ७(९) मधील तरतुदीच्या अनुषंगाने, **अपिलार्थीस सदर अभिलेखाचा जतन कालावधीच्या नियमाची प्रत व कागदपत्रे नष्ट केल्याबद्दल आदेशाची प्रत समक्ष १५ दिवसात नि:शुल्क पुरवावी.**

२. जर कागदपत्रे आढळून आली नाहीत तर सार्वजनिक प्राधिकरण तथा नगर भूमापन अधिकारी,ठाणे यांनी अभिलेख गहाळ झालेबाबत सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ प्रमाणे योग्य कारवाई करण्यात यावी.

३. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
**(थँक्सी फ्रान्सिस थेकेकरा)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २६ एप्रिल, २०१८.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
प्रथम अपिलीय प्राधिकारी, नगर भूमापन अधिकारी,ठाणे, तहसिलदार कंपाऊंड, ठाणे, ता.जि.ठाणे ४०० ६०१.

**विवेचन**

तक्रारकर्ता श्री.दिनेश अनंत कोळी यांनी द्वितीय अपिल क्रमांक के.आर ४६३९/२०१७ मध्ये आयोगाने दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, त्यांना अद्याप माहिती मिळाली नाही म्हणून आयोगाकडे

KOKAN BANCH

दि. १५.१.२०२० रोजी कलम १८ (१) (ग) खाली तक्रार दाखल केली आहे. या अपिलासंदर्भातील नस्तीवरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आर. डी. दाभाडे यांनी आयोगाच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना अद्याप माहिती दिलेली नसल्याची प्राथमिकरित्या आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आर. डी. दाभाडे तथा प्रमुख लिपिक, नगर भूमापन अधिकारी, ठाणे यांचे कार्यालय, ठाणे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २१.७.२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाने दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती पुरविली नाही म्हणून म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

सही/-

**(के.एल.बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ जानेवारी, २०२१.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. प्रथम अपिलीय प्राधिकारी, नगर भूमापन अधिकारी,ठाणे, तहसिलदार कंपाऊंड, ठाणे, ता.जि.ठाणे ४०० ६०१.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आर. डी. दाभाडे तथा प्रमुख लिपिक, नगर भूमापन अधिकारी, ठाणे यांना विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, नगर भूमापन अधिकारी, ठाणे, ता.जि.ठाणे यांचेमार्फत प्रत रवाना.

**अपिल क्रमांक : केआर -४६३९/२०१७ मधील तक्रार क्र. १८/२०२०**

अपिलार्थी, श्री.दिनेश अनंत कोळी,

**सुनावणी** दिनांक ४.१२.२०२३ **( In Continuation of order dt.२२.१.२०२१)**

**विवेचन**

उपरोक्त आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-२० (१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण ३० दिवसांत आयोगास सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

सदर सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुरेश दामू शनवार, प्रमुख लिपिक, नगर भूमापन अधिकारी ठाणे हे उपस्थित आहेत.

**सुनावणीचा तपशील :**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. रतन दामु दाभाडे, प्रमख लिपिक, सेवानिवृत्त, नवगर भूमापन अधिकारी, ठाणे यांनी दि.१४.१२.२०२१रोजीच्या पत्रान्वये आयोगास लेखी खुलासा सादर केला की, अपिलार्थी यांनी समक्ष कार्यालयात हजर राहून आवश्यक माहिती दि.१०.३.२०२१ रोजी प्राप्त करून घेतलेली आहे. (प्रत संलग्न) तरी अर्जदार यांना मागणी केलेली माहिती उपलब्ध झालेने त्यांचा विषयांकित अर्ज निकाली ठेवणेत विनंती आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानंतर दि.१०.३.२०२१ रोजी अपिलार्थी यांना माहिती दिल्याबाबतची पोहोच आयोगास सादर केली आहे. यास्तव खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**आदेश**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. रतन दामु दाभाडे, प्रमख लिपिक, सेवानिवृत्त, नवगर भूमापन अधिकारी, ठाणे यांनी सादर केलेला खुलासा व त्यासोबतच्या कागदपत्रांवरून आयोगाचे समाधान झाले असून त्यांचा दि.१४.१२.२०२१

KOKAN BANCH

रोजीचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. त्यांना दि.२२.१.२०२१ रोजीच्या निर्णयातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस मागे घेण्यात येत आहे. प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

**(भूपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ डिसेंबर, २०२३

KOKAN BANCH